# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी-४११०१८
## वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध दवाखाना/रुग्णालयांमध्ये करार/कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपाची पदे दरमहा एकत्रित मानधनावर दोन महिने कालावधीकरीता WALK IN INTERVIEW द्वारे भरणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत विविध रुग्णालये / दवाखाने / कोवीड केअर सेंटर करीता दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात दोन महिने कालावधीकरिता भरणेकरीता खालील प्रमाणे नमूद संवर्गातील पदे भरणेकामी पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, आरक्षण व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | पदसंख्या | मानधन र. रु. | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | ए.एन.एम. | १) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांचेकडील मान्यताप्राप्त ए.एन.एम अथवा जी.एन.एम कोर्स उत्तीर्ण अथवा बी.एस्सी. नर्सीग उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल कडील अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक | ८४ | २३,३००/- | दिनांक १३/०५/२०२१ पासून सकाळी १०.०० ते २.०० पर्यंत |

सद्यस्थितीत कोवीड-१९ विषाणुमुळे बाधीत रुग्णांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे नविन आकुर्डी रुग्णालय व नविन थेरगाव रुग्णालय येथील रुग्णायीन कामकाज तसेच कोवीड-१९ चे लसीकरण, कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग, स्वॅब टेस्टिंग, नव्याने सुरु होणारे कोवीड केअर सेंटर, गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहिती घेणे, कोवीड-१९ अनुषंगाने झोननिहाय इतर सर्व कामकाज करणे तसेच तदअनुषंगीक कोवीड १९ संदर्भातील सर्व कामकाज करणे कामी उक्त नमुद पदांकरीता दि. १३-०५-२०२१ पासुन WALK IN INTERVIEW आयोजित करण्यात आलेला असुन इच्छुक उमेदवारांनी सकाळी १०.०० वा. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वैद्यकिय विभाग, दुसरा मजला, पिंपरी, पुणे-१८, येथे सर्व आवश्यक व अद्ययावत कागदपत्रासह ( मुळप्रत + सत्यप्रत ) उपस्थित रहावे. प्रस्तुत जाहिरातीतील कामकाजासह आदेशातील अटी व शर्ती, मानधन व इतर सर्व बाबी प्रस्तुतच्या पदांना लागू राहतील.

**अटी व शर्ती –**

१) उक्त पदावरील कर्मचा–यांना रुग्णालयीन कामकाज, कोवीड-१९ चे लसीकरण, कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग, स्वॅब टेस्टिंग, नव्याने सुरु होणारे कोवीड केअर सेंटर, गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहिती घेणेकामी तसेच कोवीड-१९ अनुषंगाने झोननिहाय इतर सर्व कामकाज करणे बंधनकारक राहील.

२) उक्त पदावरील कर्मचाऱ्यांना कोवीड-१९ च्या अनुषंगाने महापालिका परिसरामध्ये शासनाचे निर्देशानुसार नागरिकांच्या सर्व्हेक्षणाचे/ नियंत्रीत अधिकारी नेमुन देतील असे सर्व कामकाज करणे बंधनकारक राहिल.

३) प्रस्तुत मानधनावर करावयाच्या नेमणुका पुर्णता तात्पुरत्या/ हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा हक्क सांगता येणार नाही याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

४) ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीसीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

५) निवड केलेल्या उमेदवारांना महापालिकेने ठरवुन दिलेल्या अटि–शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच महापालिकेच्या रुग्णालयामध्ये तीनही शिफ्ट मध्ये कामकाज करावे लागेल.

६) सदर उमेदवारांना महापालिकेच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत असणाऱ्या रुग्णालय / दवाखान्यामध्ये / कोवीड केअर सेंटरमध्ये कामकाज करावे लागेल तथापि नेमुन दिलेल्या रुग्णालय/दवाखान्यामध्ये आवश्यकता नसलेस अन्य रुग्णालयामध्ये नियुक्ती देण्यात येईल.

७) सदरच्या नेमणुका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखुन ठेवलेले आहेत.

सही/–

**(राजेश पाटील)**

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्रमांक ८६८

वैद्यकिय मुख्य कार्यालय

क्र वैद्य/१७/कावि/९४४/२०२१

दिनांक ११/०५/२०२१